**<u>प्रेसनोट दि.०८/०६/२०१९</u>**

**<u>सिंहगडरोड पोलीस ठाणे पुणे</u>**

**कम्युनिटी पोलीसींगचे अनुषंगाने नहे गावातील हॉटेल मालक व चालक यांची बैठक घेवुन जनजागृती**

------------------------------------------------------------------------------------

दि. ०७/०६/२०१९ रोजी नहे पोलीस चौकी प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक एस.डी.पाटील, पोलीस उप-निरीक्षक एस.एस.घाडगे व स्टाफ यांनी मिळून नहे पोलीस चौकी येथे हॉटेल मालक व चालक यांची बैठक आयोजीत केली. सदर मिटींगमध्ये पुणे पोलीस आयुक्तालयाकडून कम्युनिटीं पोलीसींग संदर्भात योजना कार्यान्वीत असून त्या संदर्भात उपस्थित हॉटेल मालक व चालक यांना माहीती सांगण्यात आली. तसेच योग्य त्या परवानगी घेणेबाबत हॉटेल मालक व चालक यांना सुचना व मार्गदर्शन करण्यात आले. अनाधिकृत हॉटेल व्यवसायकांनी परवाना घेवुन व्यवसाय करावा. हॉटेल व्यवसायिकांनी वेळेचे पालन करावे. हॉटेल मध्ये भांडणे अथवा काही अडचण उदभवल्यास त्वरीत सिंहगडरोड पो.स्टे. अथवा १०० नंबरवर कॉल करुन पोलीस कंट्रोल रुम येथे कळवावे. तसेच सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत. आपल्या आस्थापनेतील कामगारांची पोलीस स्टेशनमार्फतीने चारित्र्य पडताळणी करावी. आपल्या आस्थापनेत किंवा आजुबाजूस कोणी संशयीत व्यक्ती आढळल्यास ताबडतोब पोलीसांना कळविण्यात यावे. त्यांना त्याबाबत योग्य ते मार्गदर्शन करण्यात आले.

